CMYK

क्रांती >> पान 2

शाब्बास स्वप्नील... तुझ्या कांस्य पदकामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर पसरले हास्य - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे >> पान 3

**सुविचार**

मानवी मूल्यांना मान देणे हीच धर्माची खरी कसोटी आहे.– अज्ञात

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com arambhmarathi535@gmail.com DAILY ARAMBH MARATHI

विकणे आहे

जिजाऊ चौक, धाराशिव येथील ३१ स्क्वेअर फुट प्लॉट वरील आर.सी.सी. बांधकाम असलेली रोड टच जागा व बार लायसन्ससह विकणे आहे.

मो-9890131200

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 1 ले ■ अंक 172 वा ■ शुक्रवार, दि. 02 ऑगस्ट 2024 ■ TITLE CODE-MAHMAR52255 ■ पाने 4 ■ किंमत रू. 5

# ३४ हजार एकर जमीन होणार वर्ग १, कोंडी सुटणार

## शहरातील खरेदी-विक्रीचे व्यवहार झाले होते ठप्प, शेतकरी बचाव संघर्ष समितीच्या आंदोलनाचा जिल्ह्याला फायदा

**चंद्रसेन देशमुख । आरंभ मराठी**

**धाराशिव** : ईनाम, वतन, कुळ आदी प्रकारातील जमिनींच्या सातबारावर अडीच वर्षांपूर्वी लागलेली वर्ग दोनची नोंद आता वर्ग एकमध्ये होणार असून, यासंबंधी नेमलेल्या पाठक समितीच्या अहवालावरून शासन निर्णय निर्गमित होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.त्यामुळे जिल्ह्यासोबतच राज्यातील लाखो एकर शेतीच्या सातबाऱ्यावरील वर्ग २ ची नोंद वर्ग १ होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान आहे.जिल्ह्यातील सुमारे ३३ हजार ७५० एकरहून अधिक एकर जमिनींचा सातबारा वर्ग १ होणार असून,अडकलेले आर्थिक व्यवहार सुरळीत होण्याचा मार्ग मोकळा होण्याची आशा आहे.



वेगवेगळ्या प्रयोजनासाठी देण्यात आलेल्या जमिनींची खरेदी-विक्री करण्यापूर्वी सरकारची परवानगी घ्यावी लागते. तसेच त्यासाठी शासनाला नजराणा शुल्क भरावे लागते.मात्र अनेक भागात अशा प्रकारे नजराणा रक्कम न भरता जमिनींची परस्पर पध्दतीने खरेदी-विक्री झाल्याचे समोर आल्यानंतर प्रशासनाने अशा सर्व जमिनींच्या सातबारांवर वर्ग दोनची नोंद घेण्यास सुरूवात केली.त्यानंतर व्यवहार ठप्प झाले. सरकारने यावर तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी पुढे आल्यानंतर राज्य सरकारने यासंबंधी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली पाठक समिती नेमली. नेमलेल्या समितीच्या अहवालावरून बाजार मुल्याच्या प्रमाणात ५ टक्के नजराणा रक्कम आणि अडीच टक्के दंडाची रक्कम घेऊन या जमिनी पूर्ववत करण्यास तत्वत: मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील सुमारे ३३ हजार ७५० एकर जमिनींच्या खरेदी विक्रीचा मार्ग मोकळा होणार आहे तर महाराष्ट्रातील लाखो एकर जमिनींचे अडकून पडलेले व्यवहार सुरू होतील. दरम्यान, प्रामुख्याने धाराशिव शहरापासून अशा जमिनींच्या सातबारांवर वर्ग दोनची नोंद घेण्याची सुरूवात झाल्याने शहरी भागातील मालमत्ताधारकांची आर्थिक कोंडी झाली होती. प्रशासनाच्या या जाचक निर्णयामुळे हबतल झालेल्या शेतकऱ्यांनी शेतकरी बचाव संघर्ष समितीची स्थापना केली होती. त्यातून वारंवार आंदोलने करण्यात आल्याने सरकारने पाच टक्के नजराणा शुल्क व अडीच टक्के दंड भरून वर्ग दोनच्या जमिनींच्या खरेदी-विक्रीला परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची आशा आहे.तर दुसरीकडे यातून सरकारलाही मोठा महसूल मिळण्याची शक्यता आहे.

**अडीच वर्षापूर्वी जमिनींचे कुळ शोधले अन् झाली आर्थिक कोंडी**

जिल्ह्यात वर्षानुवर्षे वर्ग एकमध्ये असलेल्या जमिनींच्या सातबारावर अडीच वर्षांपूर्वी अचानक वर्ग दोनची नोंद झाल्याने मालमत्ताधारकांना धक्का बसला. वास्तविक पाहता महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीच आजवर अशा जमिनी वर्ग दोनमधून वर्ग एक कशा केला, याचा शोध घेऊन कारवाई करण्याऐवजी जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यात वतन, ईनाम, कूळ आदी प्रकारातील शेतीच्या सातबारांवर वर्ग दोनचा उल्लेख करण्यास सुरूवात केली. सुरूवातीला शहरातील अशा काही जमिनी ईनामी असल्याचे समोर आल्यानंतर ग्रामीण भागातही याच पध्दतीने जमिनींचे कूळ शोधण्याचे काम सुरू झाले. यातून हजारांवर एकर जमिनी या विशिष्ट प्रयोजनासाठी दिलेल्या असताना त्याची परस्पर विक्री करून शासनाचा महसूल बुडवल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अशा प्रकारातील जमिनींच्या सातबारांवर वर्ग दोनची नोंद घेण्यात आली. त्यामुळे जमिनींचे तसेच एन.ए. झालेल्या प्लॉटचे, घरांचे व्यवहार अचानक बंद झाले. वर्ग दोनची नोंद असलेल्या सर्व जमिनींची खरेदी विक्री बंद झाल्याने अनेकांची आर्थिक कोंडी झाली. गुंतवणूक म्हणून खरेदी केलेल्या प्लॉटधारकांना संकटाचा सामना करावा लागला. त्यामुळे जिल्ह्यातील प्रमुख लोकांनी एकत्र येत शेतकरी बचाव संघर्ष समिती गठीत केली. त्यातून सरकारदरबारी प्रयत्न सुरू झाले. शासनाने यावर तोडगा काढावा, यासाठी लक्षवेधी आंदोलन करण्यात आली. शेतकरी बचाव संघर्ष समितीचे अध्यक्ष धनंजय शिंगाडे,पदाधिकारी उमेश राजेनिंबाळकर, आनंद जगदाळे, सुभाष पवार, राजाभाऊ बागल आदींनी या समितीच्या माध्यमातून पाठपुरावा सुरू केला. तुळजापूर येथे तुळजाभवानी मातेच्या मंदिरासमोर जागरण गोंधळ आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाही काढण्यात आला. यातून शासनाचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. एवढेच नाही तर मुंबईला जाऊन मुख्यमंत्र्यांसह प्रमुख मंत्र्यांना भेटून समितीने मार्ग काढण्याची मागणी लावून धरली. जिल्ह्यातील सर्वच लोकप्रतिनिधींनी यासाठी सरकारवर दबाव निर्माण केला. त्यानंतर वर्ग दोनच्या जमिनींसाठी अंतिम तोडगा काढण्यात आला असून, लवकरच शासन निर्णय निर्गमित होईल, अशी आशा आहे.

### बांधकामे वाढतील, अर्थकारणाला गती मिळेल

शहराचे ६० टक्के अर्थकारण बांधकाम व्यवसायावर अवलंबून आहे. दुसरीकडे प्रशासनाने रातोरात घेतलेल्या निर्णयामुळे शेकडो एकर जमीन वर्ग दोनमध्ये गेल्यानंतर नगर पालिकेकडून बांधकाम परवाना, बँकेकडून कर्जपुरवठा बंद झाला.परिणामी अर्थव्यस्थेला ब्रेक लागला. बांधकामे बंद पडल्याने रोजगार कमी झाला. आर्थिक व्यवहार ठप्प झाले. आता वर्ग दोनच्या जमीनी वर्ग एकमध्ये आल्यास शहराच्या अर्थकारणाला गती मिळेल.

### आमच्या आंदोलनाचा सबंध राज्याला फायदा



प्रशासनाने नोटीस न देता, म्हणणे ऐकून न घेता रातोरात वतन,ईमान आदी प्रकारातील जमिनींच्या सातबारावर वर्ग दोनची नोंद घेतली. वास्तविक पाहता काही शेतकऱ्यांनी यापूर्वीच नजराणा रक्कम जमा केलेली असताना त्यांनाही मनस्ताप सहन करावा लागला. शेतकरी बचाव संघर्ष समितीच्या माध्यमातून सरकारकडे पाठपुरावा केला, आंदोलनही केले. आतापर्यंत मुंबईला २९ वेळा जावे लागले. लाखो रूपये खर्च झाले. या लढ्यात लोकप्रतिनिधींनीही सरकारदरबारी आम्हाला मदत केली.आता निर्णय अंतीम टप्प्यात आहे. आमच्या आंदोलनामुळे सबंध राज्यभरातील अशा जमिनींचा प्रश्न मिटणार असल्याने आम्हाला समाधान आहे.

**– धनंजय शिंगाडे,**
**अध्यक्ष, शेतकरी बचाव संघर्ष समिती**

## उत्सव लोकशाहीर अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीचा



**धाराशिव शहरात गुरुवारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात,विविध सामाजिक उपक्रमाने साजरी करण्यात आली. सायंकाळी शहरातील विविध भागातून मिरवणुका निघाल्या. सजवलेल्या वाहनात अण्णाभाऊंच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. मोठ्या उत्साही वातावरणात अण्णाभाऊंच्या गीतांवर तरुणाई दंग झाली होती.**

## अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी पूर्णाकृती पुतळ्यासाठी दूध संघाची एक एकर जागा मंजूर

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

**आरंभ मराठी । धाराशिव**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासाठी शहरातील शासकीय दूध शीतकरण केंद्राची एक एकर जागा राज्य सरकारने मंजूर केली आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनीच जागा मंजूर केल्याचा शासन आदेश निर्गमित करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकारले जाणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारण्याकरिता धाराशिव शहरातील शासकीय दुध शितकरण केंद्राची जागा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी अनेक दिवसांपासून केली जात होती. राज्य सरकारने गुरुवारी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी ऐतिहासिक निर्णय घेत शासकीय दूध शीतकरण केंद्राची एक एकर जागा महसुल व वन विभागाकडे प्रत्यार्पीत करण्याचा शासन निर्णय घेतला असल्याचे आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीदिनी हा महत्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील व महायुती सरकारचे आमदार पाटील यांनी मनःपूर्वक धन्यवादही व्यक्त केले आहेत. आजच्या दिवशी हा निर्णय आल्याने एक अलौकीक समाधान आपल्याला लाभले असल्याची प्रतिक्रियाही त्यांनी दिली आहे.

## डॉ. मुल्ला यांनी सोडला पदभार, आता जिल्हा शल्य चिकित्सकपद डॉ. धर्माधिकारी यांच्याकडे

**आरंभ मराठी । धाराशिव**

जिल्हा शासकीय रुग्णालयाचा जिल्हा शल्यचिकित्सकपदाचा अतिरिक्त पदभार असलेले डॉ. इस्माईल मुल्ला यांनी आपल्याकडील पदभार सोडला असून, त्यांनी वैद्यकीय रजेचे कारण दिले आहे.दरम्यान, कळंब उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.नागनाथ धर्माधिकारी यांनी जिल्हा शल्यचिकित्सक पदभार स्वीकारला असून, त्यांचे संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले.

कोरोना काळात तत्कालीन जिल्हाधिकारी कौस्तुभ दिवेगावकर यांनी डॉ. मुल्ला यांच्यावर कोरोना विभागाची जबाबदारी दिली होती. मात्र याकाळात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनंजय पाटील कमालीचे निष्क्रिय अधिकारी ठरले.आरोग्य खात्यात व्यवस्थापनातील त्रुटी आणि भ्रष्ट कारभार वाढल्यानंतर आरोग्यमंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी डॉ.पाटील यांच्या बदलीचे आदेश काढले. त्यानंतर डॉ.मुल्ला यांच्यावर जिल्हा रुग्णालयाची जबाबदारी सोपविण्यात आली. वास्तविक पाहता अनेक वरिष्ठ अधिकारी असताना डॉ.मुल्ला यांच्यावर जिल्हा रुग्णालयाची जबाबदारी सोपविण्यात आल्याने आश्र्चर्य व्यक्त करण्यात आले. मात्र, डॉ.मुल्ला यांच्या कार्यकाळात जिल्हा रुग्णालयातील काही अधिकाऱ्याकडून भ्रष्टाचार वाढला होता. रक्त पेढीच्या महिला अधिकारी डॉ.अश्विनी गोरे आणि त्यांचे पती डॉ.प्रीतम राऊत यांना नांदेड येथे लाच घेताना पकडण्यात आले होते, त्यांच्याबद्दल जिल्ह्यात प्रचंड तक्रारी होत्या.मात्र, त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नव्हती. डॉ.मुल्ला यांनी आपल्याकडील पदभार कोणत्या कारणाने सोडला असावा, याविषयी आरोग्य विभागात चर्चा रंगली आहे.

### अधिकार झेडपीला, नावालाच पद

सध्या जिल्हा शल्य चिकित्सकपदावर नियमित अधिकारी नसून अतिरिक्त पदभार सोपविला जात आहे. कर्तव्यदक्ष, निष्कलंक डॉ. राजाभाऊ गलांडे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांना पदावरून हटविण्यामागे आरोग्य विभागाचा कोणता उद्देश होता, त्यांच्याऐवजी निष्क्रिय अधिकाऱ्यांना पदावर का बसविण्यात आले, सध्या अतिरिक्त पदभार केवळ मान डोलावणाऱ्या व्यक्तीकडेच का दिला जात आहे, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.दरम्यान, जिल्हा शल्य चिकित्सक पद सध्या नावापुरतेच असून, टेंडरसह सर्व आर्थिक विषयाचे सोपस्कार जिल्हा परिषदेतून हाताळले जात असल्याची चर्चा आहे.

## नऊ वर्षापूर्वी दहा हजारांची लाच घेणाऱ्या बांधकाम विभागाच्या शाखा अभियंत्याला चार वर्षांचा कारावास

**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शाखा अभियंत्याला नऊ वर्षांपूर्वी लाच घेतल्या प्रकरणी चार वर्षे कारावास आणि पन्नास हजार रुपये दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायालय,धाराशिव यांनी सुनावली. २०१५ साली बांधकाम विभागाचे शाखा अभियंता शंकर विश्वनाथ महाजन यांनी गुत्तेदाराकडे त्याने तयार केलेल्या रस्त्याच्या कामाच्या मोजमाप पुस्तकावर सह्या करण्यासाठी १२ हजार रुपयांची लाच मागितली होती. तडजोड करून महाजन यांनी १० हजार रुपये पंचासमक्ष स्वीकारले होते. लाचलुचपत विभागाकडून ही कारवाई तत्कालीन पोलीस उपअधीक्षक अश्विनी भोसले यांनी केली होती. महाजन यांच्यावर २०१५ साली धाराशिव शहर पोलीस ठाण्यात कलम ७,१३(१)(ड),१३(२) ला. प्र. अधिनियम,१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात पी. के. जाधव यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले. महाजन यांच्यावरील आरोप सिद्ध होऊन गुरुवारी त्यांना शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना कलम ७ अन्वये ४ वर्ष कारावास व ५० हजार रुपये दंड तसेच दंड भरल्यास ३ महिने कारावासाची शिक्षा सुन्यावण्यात आली.

## बलसुर येथे भूकंप पुनर्वसनानंतर तब्बल तीस वर्षांनी मिळाले घरकुल धारकांना कबाले

**आमदार ज्ञानराज चौगुले, प्रा.सुरेश बिराजदार यांच्या हस्ते झाले वाटप**



**आरंभ मराठी । उमरगा**

भूकंप पुनर्वसनानंतर तब्बल ३० वर्षांनी बलसुर येथील १३५ घरकुल धारकापैकी ५८ जणांना कबाल्याचे वाटप सोमवारी आमदार ज्ञानराज चौगुले, राष्ट्रवादीचे नेते प्रा. सुरेश बिराजदार, नायब तहसीलदार किशोर कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. १९९३ साली झालेल्या महाप्रलयकारी भूकंपानंतर बलसुर येथे कासा कंपनीने महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून दहा एकर जागेमध्ये १३५ कुटुंबांना घरकुल बांधून दिले होते. पण सदरील जमीन ही महाराष्ट्र शासनाच्या नावेच असल्याने येथील लाभार्थींना मालकी हक्क मिळत नव्हता. यासाठी मागील अनेक वर्षापासून येथील घरकुल धारकांना त्यांच्या मालकीचे कबाले मिळण्यासाठी शासन स्तरावर माजी जिल्हा परिषद सदस्य तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रा .सुरेश बिराजदार व विद्यमान आमदार ज्ञानराज चौगुले सातत्याने पाठपुरावा करीत होते. या मागणीला यश आले असून १३५ पैकी ५८ जणांना जागेचे कबाले वाटप करण्यात आले. उपविभागीय अधिकारी गणेश पवार, तहसीलदार गोविंद येरमे यांनी सदर कबाले वाटपासाठी प्रशासकीय कार्यवाही पूर्ण केली. यावेळी सरपंच जयश्री नांगरे, सुशांत गाजुलवर, जगदीश लांडगे, मंडळ अधिकारी हांगर्गे, ग्रामविकास अधिकारी पांढरे व लाभार्थी हजर होते.

## विद्यार्थ्यांना साहित्य वाटप, वृक्षारोपण, रक्तदान; सामाजिक उपक्रमाने मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा

**आरंभ मराठी । धाराशिव**

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस शहरासह जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम घेऊन साजरा करण्यात आला कुठे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप तर कुठे वृक्षारोपण कुठे रक्तदान तर कुठे रुग्णांना औषधांचे वाटप करून वाढदिवसाचे अभिष्टचिंतन करण्यात आले धाराशिव तालुक्यातील येडशी येथे सोनेगाव चौकाला मनोज जरांगे पाटील चौक असे नामकरण करण्यात आले.

मराठा युद्ध म्हणून जरागे पाटील यांनी वाढदिवसाचा कोणताही बडेजाव न करण्याचे आवाहन केले होते. या पार्श्वभूमीवर मराठा समाज बांधवांनी गावागावात सामाजिक उपक्रम घेतले सकाळी तुळजापूर येथे कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी >> पान २



## तुळजापूर शहरात पंधरा वर्षाच्या मुलीवर पासष्ट वर्षाच्या नराधमाचा लैंगिक अत्याचार

**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर शहरात पंधरा वर्षीय मुलीवर पासष्ट वर्षांच्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. नराधमाने गोड बोलून व आमिष दाखवून मुलीची इच्छा नसताना दोन ते तीन वेळेस तिच्यावर अत्याचार केल्याचे उघड झाले. या प्रकरणी तुळजापूर पोलीस स्टेशन येथे बाल लैंगिक अत्याचार व शारीरिक अत्याचार असा गुन्हा दाखल करण्यात आला असून ६५ वर्षीय नराधमाला पोलिसांनी तत्काळ अटक केली आहे. याबाबत प्राप्त झालेल्या माहितीनुसार तुळजापूर शहरामधील पंधरा वर्षीय मुलगी ही मागील तीन महिन्यापासून आरोपीच्या घरी किराणा वस्तू आणण्यासाठी येत जात होती. पीडित मुलगी ही अल्पवयीन असून आरोपीने आमिष दाखवून दोन ते तीन वेळेस तिच्यावर बलात्कार केला. तसेच पीडित मुलगी त्या व्यक्तीपासून तीन महिन्याची गरोदर झाली असल्याने तिच्यावर उपचार सुरू आहेत. पीडित मुलीच्या वडिलांनी तुळजापूर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरून अत्याचार करणाऱ्या नराधमावर गुन्हा रजिस्टर नंबर ३४३/२०२४भादवि कलम ३७६ (१) ३७६ (२) (१) (M)(N) सह ४,६,८,१०,१२ बाल लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल चासकर हे करत आहेत. आरोपीला पोलिसांनी तात्काळ ताब्यात घेतले असून, पुढील तपास पोलीस करत आहेत. तुळजापूर पोलीस स्टेशन येथे मागील दोन दिवसात लैंगिक अत्याचाराचा दुसरा गुन्हा दाखल करण्यात आलेला असल्यामुळे या बातमीने खळबळ उडाली आहे.

CMYK

## खड्डेच खड्डे चहूकडे.... गेला रस्ता कुणीकडे....?

पाऊस आणि रस्त्यांवरील खड्डे हे जणू समीकरणच बनले आहे. थोडासा जरी पाऊस झाला तरी रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडतात. दरवर्षी पावसाळ्यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुण्यासह राज्यातील सर्वच शहरातील रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होते. यावर्षीही राज्यातील सर्वच शहरातील रस्ते खड्डेमय झाले आहेत. काही रस्त्यात तर इतके खड्डे पडले आहेत की रस्त्यात खड्डे आहेत की खड्ड्यात रस्ता हेच समजत नाही. केवळ शहरी भागातच नाही तर राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावरील रस्त्यांवर देखील खड्डे पडले आहेत. जर शहरात अशी अवस्था असेल तर ग्रामीण भागात काय अवस्था असेल याची कल्पनाच न केलेली बरी. खड्डेच खड्डे चहूकडे..... गेला रस्ता कुणीकडे....? अशीच अवस्था काही गावातील रस्त्यांची झाली आहे. रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असल्याने वाहन चालकांना तर मोठी कसरत करावी लागते. अगदी जीव मुठीत घेऊन वाहन चालक खड्डेयुक्त रस्त्यांवरून गाडी चालवत असतात. रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अनेकदा वाहनांचा अपघात होतो त्यात काही वेळा जीवितहानी देखील होते. देशात सर्वाधिक मृत्यू हे रस्ते अपघातात होतात मात्र याचे कोणाला काही सोयरसुतक नसते वास्तविक रस्ते खड्डेमुक्त करण्यासाठी शासन दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करते. रस्ता बांधणीसाठी आणि दुरुस्तीसाठीही कोट्यावधींचा खर्च केला जातो मग प्रश्न पडतो की इतका पैसा खर्च करूनही रस्त्यावरील खड्डे कायमचे नाहीसे का होत नाही? खड्डेमुक्त महाराष्ट्र करण्याचे आश्र्वासन राजकीय नेते आणि राजकीय पक्ष देत असतात मग असे असूनही परिस्थिती जैसे थे राहते याला भ्रष्ट अधिकारी, ठेकेदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांची अभद्र युती जबाबदार आहे. रस्त्यांवरील खड्डे कायमस्वरूपी बुजले जाणार नाहीत याची काळजी ठेकेदार घेतो. कारण रस्त्यांवरील खड्डे हे ठेकेदारांसाठी भविष्यातील चरण्याचे कुरण असते. राजकीय नेते व अधिकाऱ्यांचे हात ठेकेदाराने आधीच ओले केले असल्याने ते ठेकेदाराच्या पापाकडे दुर्लक्ष करतात. रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत नागरिकांनी तक्रार केली किंवा पत्रकारांनी आवाज उठवला की ठेकेदारामार्फत खड्ड्यांवर किरकोळ दुरुस्ती केली पण पाऊस आला की पुन्हा रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य पसरते. रस्त्यांवर कितीही खड्डे पडले तरी आपले कोणी काही करू शकणार नाही असा विश्र्वास ठेकेदाराला असतो म्हणून तो रस्त्यांवरील खड्डे कायमस्वरूपी बुजवण्याची तसदी घेत नाही. वास्तविक ज्या रस्त्यांवर खड्डे पडले आहेत त्या रस्त्याच्या ठेकेदारावर कारवाई व्हायला हवी. त्या ठेकेदाराला काळ्या यादीत टाकले पाहिजे इतकेच नाही तर त्या ठेकेदाराला गुणवत्तापूर्ण काम केल्याचे प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर देखील कारवाई व्हायला हवी. तेथील लोकप्रतिनिधींना देखील याबाबत जबाबदार धरले पाहिजे. त्या रस्त्याचा संपूर्ण खर्च या तिघांकडून वसूल करायला हवा. रस्त्यांवर पडणाऱ्या खड्ड्यांना या तिघांच्या अभद्र युतीस जबाबदार धरून या तिघांवर कारवाई करण्याची कडक भूमिका शासनाने घेतली तरच खड्डेमुक्त महाराष्ट्र हे स्वप्न प्रत्यक्षात येईल नाही तर हे स्वप्न स्वप्नच राहील.

# क्रांती

क्रांती म्हटलं की रक्तरंजित क्रांती, हिंसा,उठाव,रक्तपात डोळ्यासमोर येऊन जातो. कारण ऐतिहासिक पुरावे पहिले तर जास्तीत जास्त रक्तरंजितच क्रांत्या झालेल्या दिसतात. वाचण्यात आलेल्या, अभ्यासात आलेल्या ह्याच क्रांत्या आपण पाहत आलेलो आहोत.

क्रांती हा शब्द घेऊन व्याख्या करायची झाल्यास, क्रांती म्हणजे बदल होय. इतकी साधी सोपी क्रांतीची व्याख्या करता येईल. क्रांतीचा परीघ तरी काय आहे, ते आपण आज पाहणार आहोत.

क्रांती ही विविध अंगाने होत असते.वैचारिक क्रांती, हरितक्रांती, रक्तरंजित क्रांती, वैज्ञानिक क्रांती, आर्थिक, सामाजिक बदलाची क्रांती. क्रांती म्हणजे जर बदल हा असा अर्थ आपण घेतला तर त्याचा परीघ हा वैश्र्विक क्रांती पर्यंत पोहोचत असतो.

क्रांती ही गरजेतून निर्माण होते.आपण क्रांती म्हणजे बदल होय.ही व्याख्या नजरेसमोर ठेवून विचार केला तर, अनेक देशात मानवी हक्काच्या क्रांत्या झाल्याचे दिसून येते. कोणीतरी कोणावर दडपशाही करतो. मानवी हक्क हिरावून घेतले जातात. म्हणून एक समूह अत्याचार करणाऱ्याच्या विरोधात उभा राहतो. आणि मग वैचारिक किंवा रक्तरंजित क्रांती होऊन जाते.आणि त्यातून जो बदल होतो त्यास क्रांती असे म्हणतात. अशी सत्ता बदलाची परिभाषा दोन स्वतंत्र विचारातून झालेली दिसते. यात एक रक्तरंजित क्रांती तर दुसरी अहिंसक मार्गाने झालेली.खरे तर क्रांती किंवा बदल खूप विविध मार्गाने होत असतात. समूहाची देशाची गरज पाहून ही क्रांती होत असते. आता आपण महत्त्वाच्या झालेल्या क्रांत्या पाहणार आहोत भारताचा विचार केला तर, स्वतंत्र्याच्या साठी झालेली क्रांती. इंग्रजांच्या अन्याय त्याचाराला कंटाळून भारतीयांनी स्वातंत्र्याची क्रांती सुरू केली. ही स्वतंत्र्याची क्रांती म्हणजे एक तर हिंसक मार्गाने क्रांती घडवून आणली आणि दुसरी अहिंसक मार्गाने. दोन्ही क्रांत्यांना तेवढेच महत्त्व जागतिक लेवलवरती आहे. उद्दिष्ट एक प्रवाह मात्र दोन. असे आपणास दिसून येते. महात्मा गांधीजींना वाटायचं की अहिंसक मार्गाने आपण क्रांती करू आणि देश स्वतंत्र करू. तर सुभाषचंद्र बोस आणि इतर तत्सम नेते यांना वाटायचं की क्रांति रक्तरंजित मार्गाने व्हायला पाहिजे.नाहीतर स्वातंत्र्य मिळणार नाही. दोन्ही समान क्रांत्या झाल्या. परंतु अहिंसक मार्गाने यशस्वी झालेली क्रांती ही जगणे दखल घ्यावी एवढी ही क्रांती सबलतेने यशस्वी झालेली दिसते.ही क्रांती स्वातंत्र्याची होती आणि यशही मिळालं.

बदलाच्या क्रांतीचे काही विषय आपण हाताळणार आहोत.

राजसत्तेची क्रांती :– हा विषय वाचनासारखा आणि चवीचा चर्चा करण्यासारखा आहे. पूर्वी राजे राज्य करायचे. प्रबळ राजा दुर्बल राजाच्या विरोधात जंग छेडायचा. युद्ध करायचा. त्यावेळी हरायचं कोण तर त्या त्या वेळी बचाव आणि योग्य युद्धनीतीचा ज्यांनी विचार आणी नियोजन केलं ते ते विजय झाल्याचे दिसते. कैक हजार पिढ्यामध्ये हा सत्ता संघर्ष आपण जवळून अनुभवला आहे. पाहायला आहे. वाचण्यात आला आहे. जिथे जिथे लोककल्याणकारी राज्य होता ती ती राज्य खूप वर्ष चालल्याची दिसतात.जेव्हा एक राजा प्रजेचं शोषण करतो तेव्हा ती प्रजा राजाच्या विरोधात बंड करते, आणि ते राज्य स्वतः उलटून पाडते. मग दुसरा राजा गादीवर येतो. असे राजसत्तेतील क्रांतीचा इतिहास आपण पाहत आहोत.

हरितक्रांती:–हा विषय मानवी जीवन सुखकर होण्यासाठी झालेली मोठी क्रांती आहे. मानवाच्या गरजा पाहून शेती,पाणी, माती,पिके यामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होत गेलेले आहेत. जागतिक लोकसंख्येच्या प्रमाणावरती अन्नाची गरज जशी जशी जास्त भासत गेली, तसतसे हरितक्रांती मध्ये बदल झालेले दिसून येतात. जास्त उत्पादन देणाऱ्या बियाणाची निर्मिती करण्यात आली. त्याच्या पद्धती बदलल्या. आंतरपीक घेण्याच्या पद्धती बदलल्या.शेती पाणी आणि पिकांची वर्गवारी करून अभ्यास करून जास्त पिके निर्माण करून देणारी बियाणे विकसित करण्यात आली.यातून हरितक्रांती झाल्याचे दिसून येते.

वैचारिक क्रांती:– हा विषय मानवी बदलासाठी खूप महत्त्वाचा आहे.तो असा आहे की धर्म व्यवस्था, राज्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था, न्याय व्यवस्था या वैचारिक झालेल्या बदलाच्या क्रांत्या आहेत. भारतात विचार केला तर भारत देशामध्ये एकेकाळी मनुस्मृतीच्या विचाराने हा देश चालायचा. चातुर्वन्य व्यवस्था या देशात होती. गेल्या चारशे वर्षा दरम्यान सामाजिक बदलासाठी खूप मोठे कार्य झाल्याचे दिसते. छत्रपती शिवराय, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, यांच्यासारखे अनेक समाजसुधारक यांच्या विचारातून सामाजिक बदलाच्या क्रांती झाल्याचे दिसते.यातून खूप मोठे बदल झाले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जगातल्या सर्व संविधानाचा अभ्यास करून भारतातील मानवी मूल्य जतन करणारे संविधान निर्माण केले.



**मंथन :– भूमिपुत्र वाघ**
९१७२९७२४८२

संविधानाच्या आधारावरती लोकशाही निर्माण झाली. लोककल्याणकारी राज्याची सुरुवात झाली. मनुस्मृतीचं दहन केलं. आणि एक मोठी वैचारिक क्रांती घडवून आणली.

जगातल्या अनेक संविधानापैकी भारताच्या संविधानास विशेष मान्यता आहे. ज्यात स्वातंत्र्य,समता,बंधुत्व आणि न्याय या मूल्याचा अंतर्भाव असणारे भारताचे संविधान. ही विशेष झालेली वैचारिक क्रांतीच म्हणावी लागेल.

वैज्ञानिक क्रांती:– हा विषय आपण जवळून पाहत आहोत. आज विज्ञानाच्या आधारावरती जगाने खूप मोठी क्रांती केलेली आहे. विज्ञान तंत्रज्ञानामुळे चंद्र, मंगळ शोधण्यास मानवाला यश प्राप्त झाला आहे. दळणवळणाची साधने याची मोठ्या प्रमाणावरती प्रगती झालेली आहे. विमान, रेल्वे, वीज अशा विविध प्रकारचे तंत्रज्ञान जगामध्ये विकसित झाले. त्यास आपण वैज्ञानिक क्रांती असे म्हणू. तेव्हा मित्रांनो क्रांती ही खूप पैलूंनी होत असते. याकडे सकारात्मक आणि डोळसपणे पाहण्याची गरजेचे आहे. चला तर आपणही मानवी मूल्याचे जतन करणाऱ्या अनेक वैचारिक क्रांतीमध्ये विचाराच्या प्रवाहामध्ये सहभागी होऊ या.... .. जय जगत...

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त भरगच्च कार्यक्रम

**आरंभ मराठी । धाराशिव**

लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त शहरासह जिल्ह्यात अभिवादन करण्यात आले तसेच विविध सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले. धाराशिव शहरातील अण्णाभाऊ साठे चौक येथे अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून मान्यवरांकडून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्व समाज बांधवांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या. या ठिकाणी राष्ट्रीय मराठा महासंघाच्या वतीने अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला.



या कार्यक्रमासाठी आमदार कैलास पाटील, माजी नगराध्यक्ष मकरंद राजेनिंबाळकर, डॉ. प्रतापसिंह पाटील,शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख विजय सस्ते, माजी नगरसेवक सोमनाथ गुरव, राणा बनसोडे,तेली समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष रवि कोरे आळणीकर, गणेश खोचरे, चर्मकार संघटनेचे नितीन शेरखाने,मनोज पडवळ, मुकेश देडे, प्रदीप मुंडे, गौस तांबोळी,राम साळुंखे, देवानंद एडके, मराठा महासंघाचे जिल्हा कार्याध्यक्ष खंडू राऊत,विष्णू इंगळे,नाना घाडगे, निलेश साळुंखे आदींसह मान्यवर व समाज बांधव उपस्थित होते.

**अण्णाभाऊंचे विचार आत्मसात करण्याची गरज – आमदार कैलास पाटील**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना केवळ जयंती उत्सवापुरते मर्यादित न ठेवता साहित्याच्या माध्यमातून त्यांचे विचार जाणून घेऊन आपल्या जीवनात या विचारांचा अंगीकार करण्याची गरज आमदार कैलास पाटील यांनी यावेळी व्यक्त केली.

अण्णाभाऊ साठे यांची साहित्यसंपदा अनेक देशांपर्यंत विचार देण्याचे कार्य करीत आहे. जातीपातीमध्ये वाद निर्माण करणाऱ्या या वर्तमान काळात त्यांचे विचार दिशादर्शक ठरतात.त्यामुळे तरुणांनी समजात एकोपा कायम राहण्यासाठी सजग राहावे, महापुरुषांच्या विचारांचे कायम आचरण करावे,असे आवाहन केले. यावेळी जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फुले शाहु आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**आरंभ मराठी । धाराशिव**

लोकशाहिर अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त फुले शाहु आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास व अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन सामुदायिक बुध्द वंदना घेण्यात आली.साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या कार्याला उजाळा देत त्यांनी लिहिलेल्या कांदबरी,कथा, प्रवास वर्णन त्यांच्या साहित्यातुन परिवर्तन घडविण्याचे कार्य केले. त्यांचे लेखन वास्तववादी व समाजाला दिशा देणारे होते. अभिवादनावेळी अंकुश उबाळे, धनंजय वाघमारे, गायकवाड मामा,गणेश रानबा वाघमारे,संजय गजधने,स्वराज जानराव,सोहन बनसोडे, राजाराम बनसोडे, अतुल लष्करे, नाना भेंडे, प्रभाकर सोनवणे,बालाजी माळाळे, बनसोडे अन्य इतर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन धनंजय वाघमारे यांनी केले तर आभार अंकुश उबाळे यांनी मानले.



## रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात आण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांना अभिवादन



**आरंभ मराठी । धाराशिव**

धाराशिव येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. केशव क्षीरसागर, प्रा. माधव उगिले आदींसह महाविद्यालयातील सर्व गुरुदेव कार्यकर्ते आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## मुंबई पोलीस आता घोड्यावर गस्त घालणार, अश्वदलासाठी ३६ कोटी मंजूर! नेमका काय उपयोग?

**आरंभ मराठी । मुंबई**

मुंबई पोलिस दलात लवकरच माउंटेड पोलिस यूनिट (अश्व दल) स्थापन करण्यात येणार आहे. राज्य सरकारने यासाठी ३६ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मुंबई पोलिस लवकरच ३० घोडे खरेदी करणार असल्याची माहिती समोर येत आहे. तसंच, मुंबईत गस्तीसाठी पोलीस हेच घोडे वापरणार असल्याची माहिती समोर येतं आहे. राज्य सरकारने पोलिसांना ३६ कोटी रुपयांची निधी विस्तारीत केली आहे. त्यातून पोलिसांसाठी तीस तरणेबांड, सदृढ घोडे खरेदी केले जाणार आहेत. तसंच, सर्व सुविधा असलेला तबेलादेखील बांधण्यात येणार आहे. त्याचबरोबर पोलिसांना घोडेस्वारीचे प्रशिक्षण व घोड्यांचा आहार व निगा राखण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामुळं आता लवकरच मुंबई पोलिस घोड्यावरुन गस्त घालताना दिसणार आहेत.

## राज्यस्तरीय डॉ. कलाम राष्ट्रउभारणी प्रेरणा पुरस्कार सातलिंग स्वामी यांना प्रदान

**आरंभ मराठी । उमरगा**

भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या ९ व्या पुण्यतिथी निमित्त ड्रिम फाउंडेशन व डॉ. कलाम कौशल्य विकास केंद्र आणि स्वयंम शिक्षण एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार–२०२४ हा सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता, राजकिय क्षेत्रातील विशेष उल्लेखनिय कार्यासाठी दिला जाणारा राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार सातलिंग स्वामी यांना बुधवारी सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहामध्ये प्रदान करण्यात आला. विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान पंढरपूरचे अध्यक्ष हभप. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी शिवचरित्रकार शिवरत्न शेटे, ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष काशिनाथ भातगुणकी, सिध्देश्र्वर सहकारी बँक सोलापूर चे चेअरमन नरेंद्र गंभीरे, वरिष्ठ उपाध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे, माजी सैनिक संघटनेचे धाराशिव जिल्हाध्यक्ष शिवाजी चालुक्य आदी मान्यवरांसह विविध क्षेत्रातील विचारवंत, नागरिक बहुसंख्यने उपस्थित होते.



## राहुल अंधारे यांना पीएचडी प्रदान

**आरंभ मराठी । धाराशिव**

परांडा तालुक्यातील घारगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सहशिक्षक राहुल अंधारे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे विद्यापीठाकडून मानव विज्ञान शाखेअंतर्गत इतिहास विषयात पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवी प्रदान करण्यात आली.

त्यांनी सोलापूर जिल्हातील सहकार चळवळीचा इतिहास: एक चिकित्सक अभ्यास १९४७–२००० या विषयावर संशोधन कार्य केले आहे. सोमेश्र्वर (ता. बारामती) येथील मुगुटराव काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ देविदास वायदंडे यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. यासाठी प्रा डॉ किसन अंबाडे व बहिस्थ परीक्षक म्हणून प्रा. डॉ. नारायण भोसले ( मुंबई विद्यापीठ) यांनी मार्गदर्शन केले. याबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य देविदास वायदंडे ,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथील इतिहास विभाग प्रमुख , प्रा डॉ श्रद्धा कुंभोजकर, प्रा डॉ बाबासाहेब दूधभाते, रावसाहेब मिरगणे (शिक्षण निरीक्षक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय पुणे), इतिहास संशोधक प्रा डॉ श्रीमंत कोकाटे, हेमंत दळवी (उपसंचालक महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभाग) प्रा डॉ. गहिनीनाथ शेळके, प्रा डॉ चंद्रकांत चव्हाण, गटशिक्षणाधिकारी अर्जुन जाधव, शालेय व्यवस्थापन समिती व विविध शिक्षक संघटना प्रतिनिधी यांनी अभिनंदन केले आहे.

## महापुरुषांच्या विचारांचा वारसा अण्णाभाऊंनी आपल्या साहित्य निर्मितीतून पुढे नेला – किरण गायकवाड

### मुरूम येथे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**आरंभ मराठी । मुरूम**

शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या समता व सामाजिक न्यायाच्या विचारांची परीवर्तनवादी चळवळ अण्णाभाऊनी आपल्या साहित्य निर्मितीतुन पुढे नेली. नाटकातील गणवंदना बंद करुन प्रथम मायभुच्या चरणा, छत्रपती शिवबा चरणा, स्मरोनी गातो कवना असे म्हणत शिवरायांना अभिवादनाची वंदना सुरु केली. जग बदल घालुनी घाव सांगुन गेले मजं सांगून भिमराव असे म्हणत मनुवादी विचारसरणीवर घणाघाती घाव घातला. अण्णाभाऊ साठे हे अवघे दिड दिवस शाळेत जावुन अनेक कथा, कादंबऱ्या, शाहीरी कविता, लोकनाट्य, नाटके, स्फुटलेखन असे बरेच साहित्य लिखाण केले, असे मनोगत प्रमुख मान्यवर किरण गायकवाड यांनी व्यक्त केले.

मुरूम येथील साठे चौक येथील सभागृहात गुरुवारी अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीच्या निमित्ताने अभिवादन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमोद कुलकर्णी हे होते. तर प्रमुख मान्यवर म्हणून मराठा सेवा संघाचे संजय सावंत, श्रीधर इंगळे, माजी नगराध्यक्ष बबनराव बनसोडे, किरण गायकवाड, अजिंक्य मुरूमकर आदी मान्यवर उपस्थित होते. मराठा सेवा संघाचे संजय सावंत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी बबनराव बनसोडे, शेषेराव सरवदे, विनायक देडे, राजेंद्र देडे, अमित देडे, तुळशीराम देडे, मल्लाप्पा देडे, किरण देडे, बालाजी बनसोडे, सुमित बनसोडे, ओमकार कांबळे, रोहित कांबळे यांनी परिश्रम घेतले.



## अनाळा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ यांना अभिवादन



**आरंभ मराठी । अनाळा**

परंडा तालुक्यातील अनाळा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रतिमेचे पूजन विठ्ठल बल्लाळ व भाऊसाहेब क्षिरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कल्याण शिंदे, उपसरपंच विनोद कदम, दादासाहेब सरवदे,महिंद्र सरवदे, कैलास शिंदे, विकास सरवदे, संतोष शिंदे, प्रवीण सरवदे,लखन सरवदे, तानाजी शिंदे आदी उपस्थित होते.

पान १ वरून...

## विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

मातेला अभिषेक घालून जरांगे पाटील यांना दीर्घायुष्य लाभावे अशी प्रार्थना करण्यात आली यावेळी धाराशिव सह तुळजापूर आणि परिसरातील मराठा तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्यानंतर धाराशिवमध्ये हजरत ख्वाजा शमशोद्दीन गाजी यांच्या दर्गाला फुलांची चादर चढविण्यात आली. धाराशिवमध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौकात रक्तदान शिबिर घेण्यात आले तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अन्नदान वृक्षारोपण विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप असे कार्यक्रम घेण्यात आले. तालुक्यातील ढोकी येथे सकल मराठा समाज ढोकी व ढोकी परिसर यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना एक्कावन डझन वही व पाचशे वृक्षांचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला.येथील तेरणा प्रशाला,तेरणा प्राथमिक शाळा, सौ. स्नेहलता देशमुख प्रशाळा, जि. प.प्रशाला, कन्या प्रशाला, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी, जिल्हा परिषद उर्दू, जिल्हा परिषद प्राथमिक राजेश नगर, जिल्हा परिषद प्राथमिक दत्तनगर या शाळांना पेन व वृक्षांचे वाटप करण्यात आले.यासोबतच ढोकी पोलीस ठाण्यात वृक्षारोपणासाठी वृक्ष देण्यात आले तसेच दत्त टेकडी येथे वृक्षारोपण करण्यात आले. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त सकल मराठा समाजाच्या वतीने प्रतिमा पुजन करण्यात आले.या वेळी ढोकी सह परिसरातील समाजबांधव उपस्थित होते.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ ; १ लाख मराठा उद्योजकांनी घेतला महामंडळाचा लाभ

### महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांचा सत्कार

**आरंभ मराठी । मुंबई**

मराठा समाजाची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी राज्य शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची स्थापना करण्यात केली.या महामंडळाच्या माध्यमातून आजपर्यंत १ लाख उद्योजकांची संख्या पूर्ण झाली आहे.मराठा समाजातील उद्योजकांची १ लाखाची संकल्पपुर्ती केल्याबद्दल महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांचा मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री व गृहमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री अजित पवार,उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकताच मुंबई येथे सत्कार केला.

मराठा समाजाची आर्थिक प्रगती व्हावी यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ पुनर्रचित केले.या महामंडळाच्या जुन्या योजना बंद करुन नवीन सुधारित योजनांची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले.महामंडळाच्या अध्यक्षपदी अण्णासाहेब पाटील यांचे सुपुत्र नरेंद्र पाटील यांची नियुक्ती केली.

महामंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा हाती घेत नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी राज्यातील विविध जिल्हे व तालुक्यांचा दौरा करुन महामंडळाच्या योजनेचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करुन मराठा तरुण–तरुणींना उद्योजकांच्या प्रवाहात सामील केले. तसेच राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांमार्फत कर्जपुरवठा मिळवण्यासाठी सर्व संबंधिताच्या सातत्याने बैठका घेतल्या आणि राज्य शासनाच्या अर्थ विभागाने व्याज परतावा केला. महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी मंत्री महोदयांबरोबर शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी,राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांचे प्रमुख,महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, अधिकारी–कर्मचारी,लोकप्रतिनिधी, लाभार्थी यांनी तसेच अन्य संबंधितांनी सहकार्य केले.कै. आमदार अण्णासाहेब पाटील यांनी मराठा समाजाला आर्थिक निकषावर आरक्षण मिळण्यासाठी प्राणाचे बलिदान दिले.त्यांचे सुपुत्र नरेंद्र पाटील यांनी महामंडळाच्या अध्यक्षपदी केलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद व उल्लेखनीय असेच आहे. हे त्यांच्या कार्यप्रणालीवरुन सिध्द होत असून उपस्थित मंत्र्यांनी त्यांचे कौतूक केले.

**महामंडळाकडून ८३२ कोटीचा व्याज परतावा**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांतर्गत आजपर्यंत १ लाख १४ हजार मराठा युवक–युवतींनी लाभ घेतला.त्यांना विविध बँकांनी ८ हजार ३२० कोटी रुपयांचे व्यावसायिक कर्ज वितरीत केले.त्यापैकी महामंडळाने ८३२ कोटी रुपयांचा व्याज परतावा केला आहे.



# शाब्बास स्वप्नील... तुझ्या कांस्य पदकामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर पसरले हास्य - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे


## ■ ऑलिंपिकवीर स्वप्नील कुसाळेला एक कोटी रुपयांचे पारितोषिक जाहीर ■ मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री पवार यांनी साधला पॅरिसमधील स्वप्नीलशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद

**आरंभ मराठी । मुंबई**

शाब्बास स्वप्नील... तुझ्या कांस्य पदकामुळे महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य पसरले आहे. तुझी कामगिरी महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. तू आमचा अभिमान आहेस, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नेमबाज स्वप्नील कुसाळेचे अभिनंदन केले. तसेच या कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल, असे जाहीर केले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पॅरीसमध्ये असलेल्या ऑलिंपिकवीर स्वप्नीलशी तसेच त्याच्या प्रशिक्षक दिपाली देशपांडे, विश्र्वजीत शिंदे यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संपर्क साधला.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, स्वप्नीलचे रौप्य पदक अवघ्या ०.१ गुणांनी हुकले आहे. तरीही त्याने कांस्य पदक पटकावल्याने महाराष्ट्राच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. महाराष्ट्राला वैयक्तिक कामगिरीसाठी ७२ वर्षांनी पदक मिळाले आहे. या कामगिरीसाठी स्वप्नीलला एक कोटी रुपयांचे पारितोषिक दिले जाईल. त्याचा आणि त्याचे प्रशिक्षक, आई-वडील यांचा यथोचित सत्कारही केला जाईल. याशिवाय स्वप्नीलला नेमबाजीतील पुढील तयारीसाठी आवश्यक, त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. स्वप्नीलने आपल्या कामगिरीने इतिहास रचला आहे. या यशासाठी कुसाळे कुटुंबियांसह, त्याला मार्गदर्शन करणारे, प्रशिक्षक आदींची मेहनत महत्वाची ठरली आहे.





उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले, महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनचा अध्यक्ष म्हणून नेमबाजी स्वप्नीलचे हे यश आनंददायी आहे. स्वप्नीलचा महाराष्ट्राला रास्त अभिमान आहे. नेमबाजीतील या क्रीडा प्रकारात पदक पटकावणारा स्वप्नील एकमेव भारतीय खेळाडू ठरला आहे. आपण राज्यातील विविध क्रीडा प्रकारांसाठी खेळाडू, प्रशिक्षक यांच्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देत आहोत. राज्यातील क्रीडा संकुलांच्या सुविधांचाही विस्तार करत आहोत. ऑलिंपिकहून परतल्यानंतर स्वप्नीलचे महाराष्ट्रात स्वागत आणि यथोचित सत्कार केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

ऑलिंपिकवीर स्वप्नील म्हणाला की, पुण्यातील क्रीडा प्रबोधिनीमध्येच सराव करताना नेमबाजीचा चांगला पाया घातला गेला. माझ्या यशात कुटुंबियांसह, आईच्या मायेने प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षक श्रीमती देशपांडे, श्री. शिंदे यांचा मोला वाटा आहे. या संवादात मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी स्वप्नील कुसाळेचे आई-वडील, प्रशिक्षक, मार्गदर्शक सर्वांचे अभिनंदन केले.

## विविध वृत्त...

### खादीम रफिक यांची निलंगा विद्यार्थी कार्याध्यक्षपदी निवड



**आरंभ मराठी । तुळजापूर**

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची लातूर जिल्हा कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून, त्यात खादिम रफिक यांची निलंगा राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. निवडीचे पत्र राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे, लातूरचे जिल्हाध्यक्ष संजय शेटे व विद्यार्थी जिल्हाध्यक्ष चेतन पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### सिंदफळ येथे बस थांब्याचे उद्घाटन



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील सिंदफळ येथे श्री छत्रपती संभाजी महाराज नगर धुळे -सोलापूर महामार्ग येथे एसटी बस स्टॉप चे उद्घाटन करण्यात आले. गुरुवारी तुळजापूर आगार प्रमुख रामचंद्र शिंदे यांच्या हस्ते याचे उदघाटन करण्यात आले असून या थांब्यामुळे येथील नागरिक व विद्यार्थी यांना फायदा होणार आहे. यावेळी वाहतुक नियंत्रक रूषीकेश जगदाळे, भ्रष्टाचार निर्मूलन संघटनेचे महाराष्ट्र कार्याध्यक्ष आबासाहेब कापसे, रोटरी क्लब अध्यक्ष प्रशांत अपराध, भारत व्यवहारे, चालक विनोद मुगुटराव, नाना एखंडे, शिवाजीराव माळी, विनोद व्यवहारे, ज्ञानदेव माळी व नागरिक उपस्थित होते.

### तलमोड येथील शाळेत टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**आरंभ मराठी । उमरगा**

उमरगा तालुक्यातील तलमोड येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालयात गुरूवारी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करण्यात आले. शाळेत प्रतिमेचे पूजन प्रशालेतील जेष्ठ शिक्षक माळी के.बी. व श्रीमती वडदरे एन.टी. यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी कार्यक्रमाचे अध्यक्ष सूर्यवंशी एम.आर. हे होते. अध्यक्षीय भाषणात बोलताना त्यांनी लोकमान्य टिळकांची स्वातंत्र्यनिष्ठा व अण्णाभाऊ साठे यांचे साहित्यप्रेम यावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक श्रीमती बिराजदार ए.एस.व आभार जाधव जे.जी.यांनी मानले. याप्रसंगी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### भूम येथे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**आरंभ मराठी । भूम**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त भूम शहरातील साठे नगर, लहुजी साठे नगर येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन भूम परंडा वाशी विधानसभा प्रमुख बाळासाहेब काका क्षीरसागर, वंचित आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण दादा रणबागूल, माजी नगराध्यक्ष विजयसिंह दादा थोरात, यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ध्वजारोहण बाळासाहेब काका क्षीरसागर, व माजी नगराध्यक्ष गौरीशंकर भाऊ साठे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती शिवसेना उद्धव गटाचे दिलीप शाळू महाराज, काँग्रेस तालुकाध्यक्ष रुपेश आप्पा शेंडगे, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष विनोद नाईकवाडी, राष्ट्रवादी नेते आबासाहेब मस्कर, माजी नगरसेवक पिंटू माळी, ओम तहसीलचे नायब तहसीलदार हरिश्र्चंद्र पवार, वंचित आघाडीचे शहराध्यक्ष रोहित गायकवाड, भाजप तालुका सरचिटणीस संतोष सुपेकर, राष्ट्रवादी मागासवर्गीय सेलचे तालुका अध्यक्ष गणेश दादा साठे, ऑल इंडिया पँथर सेनेचे मराठवाडा कार्याध्यक्ष चंद्रमणी गायकवाड, हेमंत देशमुख, शंकर खामकर, माजी शहर प्रमुख दीपक मुळे, गवळी काका यांची उपस्थिती होती.

### सावरगाव येथे शालेय साहित्याचे वाटप



**आरंभ मराठी । तुळजापूर**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथे जि.प.प्रशाला , जि.प. कन्या प्रशाला येथे शाळेतील ८०० विद्यार्थ्यांना सकल मराठा समाज सावरगांव यांच्या वतीने विविध शैक्षणिक साहित्याचे वाटत करण्यात आले. यावेळी गावातील सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

## शेतकऱ्यांच्या थकीत ऊस बिलासाठी तुळजापूर येथे भीक मागु आंदोलन




**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग येथील तुळजाभवानी शेतकरी साखर कारखाना हा गोकुळ शुगरने भाडेतत्त्वावर घेतला असून, २०२३-२४ या हंगामातील शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे अद्याप पर्यंत न दिल्याने तुळजापूर येथे गुरुवारी भीक मागू आंदोलन करण्यात आले. नळदुर्ग येथील तुळजाभवानी साखर कारखाना गोकुळ शुगर यांनी भाडेतत्त्वावर चालवण्यासाठी घेतला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी या कारखान्यात आपला ऊस दिला होता. दिवस रात्र कष्ट करून लाखो रुपये खर्च करून जोपासलेला ऊस कारखान्याला दिल्यानंतर कारखान्याकडून पैसे येतील या आशेवर शेतकरी होते. परंतु गेल्या सात ते आठ महिन्यापासून कारखान्याने शेतकऱ्यांना फक्त आश्र्वासने दिली आहेत. मात्र अद्यापही एक रुपया सुद्धा शेतकऱ्यांना दिलेला नाही. वेळोवेळी निवेदन देऊन व आंदोलन उपोषण करून सुद्धा कोणताही फरक पडलेला नाही. त्यामुळे तुळजापूर येथे शेतकऱ्यांनी भिक मागू आंदोलन केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून तुळजाभवानी मंदिरापर्यंत हे आंदोलन करण्यात आले. तसेच भीक मागु आंदोलनातून जमा झालेली रक्कम ही पालकमंत्री, जिल्हाधिकारी, डी डी आर, तहसीलदार, तुळजापूर तालुक्याचे आमदार यांना मनीऑर्डर द्वारे पाठवण्यात येणार असल्याचे सांगितले. येत्या दहा दिवसात शेतकऱ्यांची पूर्ण रक्कम जमा न केल्यास आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आंदोलनकर्ते अमोल शिवाजीराव जाधव यांनी दिला आहे. यावेळी तुळजापूरचे माजी नगरसेवक राहुल खपले, नवनाथ जगताप, राज खपले, शरद जगदाळे, सतीश झाडे, महेश कोळेकर, अंकुश कोकरे, किरण अमृतराव यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## अनाळा येथील न्यू हायस्कुल शाळेचे मुख्याध्यापक वसंत हिवरे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**आरंभ मराठी । अनाळा**

परंडा तालुक्यातील अनाळा येथील जय जवान जय किसान शिक्षण संस्था संचलित न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक वसंत दत्तात्रय हिवरे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सपत्निक भव्य सत्कार करून मान्यवरांच्या हस्ते निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार राहुल मोटे , जि.प. चे माजी बांधकाम सभापती दादासाहेब पाटील सोनारीकर, रणजितसिह पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती . या कार्यक्रमात विविध मान्यवरानी सेवानिवृत्त मुख्याध्यापक वसंत हिवरे यांनी शाळेसाठी केलेल्या योगदानाबद्दल कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तालुक्यात एक आदर्श मुख्याध्यापक म्हणून वसंत हिवरे यांची




ओळख आहे. त्यांना निरोप देताना सर्व शिक्षक विद्यार्थी - विद्यार्थीनी यांना गहिवरून आले होते. कार्यक्रमास न्यू हायस्कुल शाळेचे संस्थापक सचिव लक्ष्मणराव वारे, शाळेचे अध्यक्ष दत्तात्रय पाटील , उपसरपंच कल्याण शिंदे नितीन शिंदे, जय हनुमान विद्यालयाचे माजी प्राचार्य नारायण भांडवलक, सोसायटी चे चेअरमन दशरथ हिवरे , हभप महालिंग महाराज , हभप सतीश महाराज , जेष्ठ नागरिक हारीभाऊ हिवरे , विजयकुमार वानगोता परिसरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक , शिक्षक , गावातील पालक , ग्रामस्थ सर्व शिक्षक विदयार्थी विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सचिन पाटील यांनी केले तर आभार बाळासाहेब वरपे यांनी केले.

## ठाकरे-फडणवीस वादात रामदास आठवले मुख्यमंत्री होणार?

**आरंभ मराठी । मुंबई**

राज्यात सध्या उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील वादाची चर्चा रंगली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले असताना दोन्ही नेते एकमेकांवर कुरघोडी करताना दिसत आहे. देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना ठोकून काढा असा संदेश दिल्यानंतर उद्धव ठाकरेंनी हात उगारला तर हात ठेवायचा नाही असे सांगितले आहे. यादरम्यान रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे नेते रामदास आठवले यांनी मात्र या वादात उडी घेत हा वाद सुटला नाही तर आपणच मुख्यमंत्री होऊ असे विधान केले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त राम दास आठवले पुण्यात अभिवादन करण्यासाठी आले होते. यावेळी पत्रकारांनी त्यांना यावेळी पुढचा मुख्यमंत्री कोण असा प्रश्न विचारला. त्यावर ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्यामधील वाद मिटला नाही तर पुढचा मुख्यमंत्री मीच असेन असे म्हटले. यानंतर एकच हास्यकल्लोळ झाला.

## तेर येथे लोकशाहीर आणाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**आरंभ मराठी । तेर**

तेर येथे लोकशाहीर आणाभाऊ साठे चौकात आणाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी साठे चौकात समाजबांधवांकडून लोकशाहीर आणाभाऊ साठे यांचे प्रतिमा पुजन करण्यात आले.

यावेळी बुद्ध भुक्खु सुमेधजी नागसेन यांनी आपले विचार मांडले. अभिमन्यू रसाळ यांनी आणाभाऊ साठे यांची कार्य सांगून समाजाच्या हितासाठी सर्वांनी एकत्रित येऊन काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य , बापू नाईकवाडी अमोल कसबे इर्शाद मुलांनी, विलास रसाळ , प्रज्योत रसाळ, सुमेध वाघमारे, शुभम शिंदे, नारायण साळुंखे, विनोद कांबळे, अमोल रसाळ, लखन रसाळ, रंगनाथ लोमटे, भिवाजी वाघमारे, राम तेरकर, संजय डोलारे, दत्ता तेरकर, शशिकांत सोनवणे, संतोष वाघमारे, सुखदेव



पेठे, दत्ता कांबळे, नारायण लोमटे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साहित्यरत्न लोकशाहीर आणाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तुगांवमध्ये विद्यार्थ्यांना साहित्य वाटप

**आरंभ मराठी । धाराशिव**

तालुक्यातील तुगाव येथे सकल मराठा समाजाच्या वतीने संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व भाई उद्धवराव पाटील हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप



करण्यात आले. तसेच शालेय परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी गावातील समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# भूम पंचायत समितीला महिलांचा घेराव

## ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यांच्या कामकाजाविषयी महिलांचा अधिकाऱ्यांसमोर तक्रारीचा पाढा

**आरंभ मराठी । भूम**

शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख अर्चनाताई दराडे यांच्या नेतृत्वात भूम पंचायत समिती कार्यालयाला महिलांनी घेराव घालून तालुक्यातील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी यांच्या अजब कारभाराविरोधात अधिकाऱ्यांसमोर तक्रारीचा पाढा वाचला. दराडे यांनी काही महिलांसह गटविकास अधिकारी चकोर यांची भेट घेऊन निवेदन दिले. दिलेल्या निवेदनात असे नमूद केले आहे की, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी भूम तालुक्यातील असंघटीत कामगारांचे बांधकाम व इतर कामगार मंडळाकडे स्वखर्चातून मोफत नोंदणी अभियान राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भूम तालुक्यातील काही ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र वितरीत केले आहेत. तर काही ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी सदर ९० दिवस किंवा अधिक दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्यास नकार देत आहेत. हे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार आम्हाला नाही किंवा संघटीत कामगारांना लागणाऱ्या कागदपत्रांची पूर्तता करण्याची




मागणी असंघटीत मजुरास करतात. जे न्याय योग्य नाही, अश्या ग्रामसेवकास व ग्रामविकास अधिकाऱ्यास आदेशित करावे. आपण आदेशित दिल्यानंतरही कर्मचाऱ्यानी आवश्यक प्रमाणपत्र देण्यास नकार दिला आहे. काही महिलांनी ग्रामसेवक यांना संपर्क साधला असता त्यांनी टोलवा टोलवीची उत्तरे दिली. महिलांनी दराडे यांच्याशी साधला होता. त्यांनी सर्व महिलांना घेऊन पंचायत समिती मधील अधिकाऱ्यांना ग्रामसेवक यांच्या कामकाजविषयी विचारणा करत घेराव घातला. यावेळी तालुक्यातील शेकडो महिला उपस्थित होत्या.

### महिलांच्या तक्रारी काय आहेत...

आमच्या गावामध्ये ग्रामसेवक येतच नाही, ग्रामसेवक कोण आहेत हे अजून आम्हाला माहीतच नाही, ग्रामसेवक फोन उचलत नाहीत. बांधकाम मजूर व बांधकाम नोंदणी फॉर्म वर सही करन्याचे अधिकार आम्हाला नाहीत, आम्ही या फॉर्म वर सही करत नाही अशी उत्तरे ग्रामसेवक देतात असे महिलांकडून सांगण्यात आले.

"आमच्या गावातील ग्रामसेवक यांच्याशी संपर्क साधला असता मी लग्नाला आलो आहें, आल्यावर बघू अश्या प्रकारचे उत्तर देऊन टाळाटाळ केली जात आहें.
**-शाहीना पठाण, महिला भोनगिरी**

"मी आमच्या गावात ग्रामसेवक आलेले पाहिलेच नाही. अजून आमच्या गावामध्ये ग्रामसेवक कोण आहेत हेच माहित नाही. ओळखीच्या व्यक्तीकडून त्यांचा संपर्क घेऊन संपर्क साधला.
**-ज्योती नाईकनवरे, महिला- बावी**

"ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांनी आवश्यक प्रमाणपत्र देण्यास नकार दिल्यास त्यांच्या विरुद्ध उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर येथील खंडपीठामध्ये जनहित याचिका दाखल करण्यात येईल.
**-अर्चनाताई दराडे महिला शिवसेना जिल्हाप्रमुख**

विविध वृत्त...

## तानाजीराव सावंत युवा मंचतर्फे जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा




**आरंभ मराठी । भूम**

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भूम येथील ग्रामीण रुग्णालय येथे प्रा डॉ तानाजीराव सावंत युवा मंचच्या वतीने रुग्णांना फळे वाटप व सोजर मूकबधिर शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले. सर्व कार्यक्रमाचे आयोजन संस्थापक अध्यक्ष प्रभाकर शेंडगे यांच्या वतीने करण्यात आले. दरम्यान सोजर मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांनी जरांगे पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. ग्रामीण रुग्णालयामध्ये फळे वाटप करताना वैद्यकीय अधिकारी डॉ. कुलकर्णी, वैद्यकीय अधिक्षक सुजीन नायकल तर सोजर मूकबधिर शाळेमध्ये मुख्याध्यापक सावंत सर, शिक्षक गवळी सर,डमरे सर, नलवडे सर, जगदाळे सर, चव्हाण सर, केदार सर, भंडारे सर, नरवडे मॅडम व युवा मंचाचे अध्यक्ष प्रभाकर शेंडगे, अमोल भसाड, विकास बाबर, मुकेश भगत, रवी शेंडगे, हानु शेंडगे, विजय शेंडगे, शिवम केदारी, पत्रकार रोहित चंदनशिवे उपस्थित होते.

## न.प.प्रा.शा.क्र.२ येथे टिळक व अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन



**आरंभ मराठी । तुळजापूर**

तुळजापूर येथील नगरपरिषद प्राथमिक शाळा क्रमांक २ येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक किशोर साठे, मुख्याध्यापक गणेश रोचकरी, सहशिक्षक सुरजमल शेटे ,पालक लक्ष्मी देवकर व विद्यार्थी प्रतिनिधी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.महेंद्र कावरे यांनी अण्णाभाऊ साठे ,लोकमान्य टिळक यांच्या विषयी माहिती दिली. यावेळी मुख्याध्यापक गणेश रोचकरी, माजी नगरसेवक किशोर साठे यांनी मनोगत व्यक्त केले. शंभू शिंदे, कु. वेदिका क्षीरसागर यांनीही भाषण केले. यावेळी महेंद्र पाटील ,बाळासाहेब जेटीथोर, सुज्ञानी गिराम, केरण लोहारे, विद्यादेवी स्वामी, अंगणवाडीच्या सेविका किरण गरडकर, मदतनीस श्रीदेवी पाचंगे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## शाम पडवळ यांचा सेवानिवृत्ती निमित्त गौरव



**आरंभ मराठी । उपळे**

हरिभाऊ घोगरे हायस्कूल उपळे (मा.) या प्रशालेत शाम तुकाराम पडवळ यांच्या सेवापुर्ती निमित्त निरोप व सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. नियत वयोमानानुसार घेण्यात येणाऱ्या सेवापूर्तीच्या कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते भाई बळवंतराव बाप्पांच्या स्मृतीस्थळाच्या ठिकाणी वृक्षारोपण करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपळा रयत शिक्षण प्रसारक संचलित उपळे (मा.)चे अध्यक्ष प्रभाकर दत्तात्रय घोगरे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी धाराशिव येथील दत्तप्रसाद जंगम, ह. भ. प. राजनाथ पांचाळ महाराज श्री काळभैरवनाथ मंदिर लातूर व पुजारी (तात्या) संत गोरोबाकाका मंदिर तेर हे होते, तर प्रमुख उपस्थिती उपळे रयत शिक्षण प्रसारक संस्था उपळे (मा.) चे जनरल सेक्रेटरी अरुण बळवंतराव घोगरे यांची होती. अध्यक्षांनी आपल्या मनोगतातून पडवळ सरांच्या कार्यांचा आढावा घेतला. गावातील तलाठी व सरांचे माजी विद्यार्थी पडवळ यांनी प्राथमिक शाळेपासून सरांनी केलेले सहकार्य व त्यांच्या सहकार्यामुळे आज त्यांचे असलेले अस्तित्व यावर प्रकाश टाकला. विद्यार्थ्यांनी सरांबद्दल असलेले प्रेम व आदर आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी उपळा गावचे सरपंच मुन्नाभैया घोगरे, उपसरपंच विकास शंकराव पडवळ, माजी शिक्षक तसेच प्रशालेतील माजी विद्यार्थी विद्यार्थिनी, नातेवाईक, त्यांचे गुरु, गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका प्राचार्य श्रीमती नलावडे यांनी केले तर सूत्रसंचालन कांबळे सर व अक्षय राऊत यांनी केले व आभार प्रदर्शन मैंदाड यांनी केले.



# मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बावी येथे भव्य ट्रॅक्टर मोर्चा

**आरंभ मराठी । येरमाळा**

मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वाशी तालुक्यातील बावी येथील सकल मराठा समाजाच्या वतीने वाशी तहसील कार्यालयावर विविध मागण्यासाठी गुरुवारी ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शेकडो टॅक्टर सह,चार चाकी,दुचाकी जेसीबी वाहनांसह बावी गावातील सकल मराठा समाजाचा मोठ्या संख्येने सहभाग होता. यावेळी मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण व १९५१, १९६१ च्या जनगणनेची नोंदीचे रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यात यावे, मराठा समाजास ओबीसी प्रवर्गातून

### हजारो नागरिक सहभागी

आरक्षण मिळावे अशा मागण्या करण्यात आल्या. जरांगे पाटील एक वर्षापासून उपोषण व आंदोलन करत आहेत त्यांच्या मागण्या मान्य न केल्याने मराठा समाजात प्रचंड असंतोष, आक्रोश आहे. तरी मराठा समाजास तात्काळ ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देवून मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. तहसिल कार्यालयाच्या परिसरात असणारी महा–ई–सेवा केंद्र, आपले सरकारे केंद्राचे संचालक व तहसिल कार्यालयातील कर्मचारी संगनमताने विहित शुल्कापेक्षा अधिकचे शुल्क आकारत असून, मराठा समाजातील नागरीकांची आर्थिक पिळवणूक करत आहेत. तसेच केंद्रसंचालक अर्जदाराचे मोबाईल नंबर न टाकता स्वतःचे मोबाईल क्रमांक टाकतात त्यामुळे अर्जदारास अर्जाची सध्यस्थिती कळत नाही.तरी आपण तहसिल कार्यालयातील कमिशन पध्दत बंद करून सर्व प्रमाणपत्रे विहित दराने उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी असे निवेदनात म्हटले आहे.

### दोनशे वाहनांचा सहभाग

बावी येथुन सकाळी साडे नऊ वाजता निघालेल्या मोर्चातुन ट्रॅक्टर ६१, जे.सी.बी.३, मोटरसायकल ९०, पिकअप १, चार चाकी ५ या वाहनाचा ताफा घोषणा देत बारा वाजता वाशी तहसील कार्यालयावर धडकला. वाशी शहर वाहनासोबतच घोषनांच्या आवाजाने दणाणून गेला होता. यावेळी हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. बावी सकल मराठा समाजाकडून तहसीलदार राजेश लांडगे यांनी निवेदन स्विकारले.

## नूतन शाळेत अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**आरंभ मराठी । धाराशिव**

नूतन प्राथमिक विद्यामंदिरमध्ये लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी लोकमान्य टिळक यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी शाळेतील तिसरी व चौथी या मुलांची भाषण स्पर्धा घेण्यात आल्या. शाळेतील मुलांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जीवन कार्याविषयी




माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक प्रदिपकुमार गोरे तर कार्यक्रमास प्रशालेतील सहशिक्षक रामराजे पाटील, संतोष माळी, रमेश वागतकर, उमरकर, दिपाली राऊत, शितल देशमुख, उषा मिसाळ, अश्रिवनी बुकन, जाधव, बिराजदार, कांचनबटवे, अंजली कुलकर्णी यांच्यासह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण गोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन नितीन देशमुख यांनी केले.

## सांगवी मार्डी येथे टिळक आणि साठे यांना अभिवादन

**आरंभ मराठी । सांगवी**

तुळजापूर तालुक्यातील सांगवी मार्डी येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ वी जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतीमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी सरपंच युवराज बागल, उपसरपंच सतीश बागल, ग्रामसेवक प्रदीप लाटकर, अंगणवाडी कार्यकर्त्या चंदाराणी गायकवाड, कर्मचारी सुरेश डोलारे, अनिल पवार, गणेश शिंदे, रोहन बागल, मेघराज बागल हे उपस्थित होते.



## के. टी. पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांना अभिवादन

**आरंभ मराठी । धाराशिव**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित के. टी.पाटील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांना पुण्यतिथीनिमित्त व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अमोल जोशी यांनी मनोगत व्यक्त केली. लोकमान्य टिळक आधुनिक भारतातील प्रमुख वास्तुविशारदांपैकी एक होते. ब्रिटीशांविरोधातील स्वराज्याचे पहिले आणि प्रबळ समर्थक होते. परंतु टिळक हे एक प्रगल्भ राजकारणी आणि विद्वान होते. त्यांना प्रेमाने 'लोकमान्य'म्हणजे 'लोकांनी स्वीकारलेले' म्हटले. तसेच लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या बद्दल बोलताना त्यांनी जवळपास २१ कथासंग्रह आणि ३०




पेक्षा अधिक कादंबऱ्या लिहिल्या. मराठी साहित्यातील लोकनाट्य, पोवाडे, लावणी, प्रवास वर्णने, कथा, कविता, गीते इत्यादी क्षेत्रात त्यांनी समृद्ध लेखन केले आहे. अण्णाभाऊंच्या साहित्यातून समाजातील वैर नष्ट करण्याचे सामर्थ्य दिसून येते. वैजयंता आणि फकिरा ह्या त्यांच्या काही प्रसिद्ध कादंबऱ्या आहेत असे जोशी यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. अतुलकुमार अलकुंटे, उपकार्यक्रमाधिकारी प्रा. शिवरत्न खरे, प्रा. पल्लवी हंगरगेकर, स्वयंसेवक तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**आरंभ मराठी । धाराशिव**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती भारतीय जनता पार्टी कार्यालय प्रतिष्ठान भवन येथे साजरी करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्यगाथा आपल्या लेखणीतून रशियापर्यंत पोहोचवणारे साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे हे विज्ञानवादी दृष्टिकोनातून पृथ्वी ही शेषनागाच्या डोक्यावर तरलेली नसून ती कामगार व कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे असे ठामपणे सांगत होते. अण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी कथा, कादंबऱ्या, वगनाट्य, प्रवासवर्णने, लोकगीते, पोवाडे इत्यादी




साहित्यांची निर्मिती केली. त्यांच्या सबंध साहित्यात महाराष्ट्र प्रेमाची आस दिसून येते. अण्णाभाऊंच्या साहित्यामध्ये मुंबई बरोबरच कृष्णा, कोयना, वारणेचा सजीव देखावा रेखाटलेला असून निसर्ग प्रेमाची आस्था अण्णाभाऊंच्या साहित्यातून दिसून येते. त्यांचे एकूण सामाजिक कार्य व साहित्य हे ग्रामीण जीवनाची व्यथा व कथा सांगणारे असून त्यांचे जीवन समाजासाठी सामाजिक न्याय आणि हक्कांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत नितीन काळे यांनी यावेळी व्यक्त केले. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष अभय इंगळे, निहाल काझी, बाळासाहेब खांडेकर, उद्धव पाटील, नामदेव नायकल, अमोल पाटील, शिवाजी गव्हाणे, अमर बाकले, सागर दंडनाईक यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा योध्दा मनोज (दादा) जरांगे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना फळे वाटप

**आरंभ मराठी । धाराशिव**

तालुक्यातील वाडी (बामणी) येथे गुरुवारी सकाळी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त, अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त व मराठा योद्धा मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजाई विद्यालयात, जि.प.शाळा व अंगणवाडीत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना फळे वाटप करण्यात आली. यावेळी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागेंद्र पाटील होते. यावेळी उपसरपंच अमर माने,दिपक टकले,संजय पारवे,समाधान माने,प्रथ्वीराज मोटे,शाहूराज मोटे,मिटू शिंदे,अंकुश शिंदे यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना फळे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना उपसरपंच अमर माने यांनी विद्यार्थ्यांना लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी माहिती सांगून मराठा योध्दा मनोज (दादा) जरांगे पाटील यांच्या विषयी सांगताना म्हणाले की, मनोज जरांगे यांना लहानपणापासूनच समाज सेवेची आवड असल्याने ते नेहमी सामाजिक चळवळीत राहत होते.

जरांगे पाटलांच्या घरची परिस्थिती बेताचीच. पण समाजसेवेची आवड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. अगदी स्वत:च्या मालकीची जमीन विकून त्यांनी मराठा आरक्षण चळवळीला बळ दिले. यासाठी त्यांनी कित्येक मोर्चे काढले, आमरण उपोषणे केली, रास्ता रोको केले.मराठा समाजासाठी लढवय्या कार्यकर्ता अशी मनोज जरांगे पाटलांची संपूर्ण मराठवाड्यात ओळख निर्माण झाल्याचे सांगून पूर्णवेळ मराठा समाजाच्या प्रश्नांसाठी काम करणारे म्हणूनही मनोज दादा यांची ख्याती निर्माण झाल्याचे सांगितले. मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे, यासाठी चळवळीच्या माध्यमातून गेल्या १० ते १५ वर्षापासून मनोज जरांगे पाटील काम करत आहेत.




THIS LETTER PRINTED BY ADESH PRINTERS, RAMKRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED BY RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) ON BEHALF OF CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH AND PRINTED AT ADESH PRINTERS, RAM- KRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST.DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED AT RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) EDITOR SHRI. CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०